**शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध सुरु असलेल्या विभागीय चौकशा कंत्राटी तत्वावरील सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांमार्फत करण्याच्या पद्धतीत बदल करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
शासन निर्णय क्र.एसपीओ-२८०७/प्र.क्र.२१/०७/११-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- २८ ऑक्टोबर, २००९.

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीडीआर-११८७/१५८१/४५/११, दिनांक २९ डिसेंबर, १९८८
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसपीओ-२८०४/प्र.क्र.११/२००४/११-अ, दिनांक २६ मे, २००६

**प्रस्तावना :-**

शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध सुरु असलेली विभागीय चौकशीची प्रकरणे त्वरेने पूर्ण करण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ नुसार प्रादेशिक विशेष अधिकारी, विभागीय चौकशा (गट-'अ' व 'ब' करीता) आणि जिल्हा चौकशी अधिकारी, विभागीय चौकशा (गट-'क' व 'ड करीता) ही पदे सामान्य प्रशासन विभागाच्या नियंत्रणाखाली निर्माण करण्यात आली होती. तथापि, राज्यातील अनेक जिल्हा चौकशी अधिकारी व प्रादेशिक विशेष अधिकारी यांची पदे दीर्घकाळ रिक्त राहिल्यामुळे व्यपगत झाल्याने विभागीय चौकशीची प्रकरणे मोठया प्रमाणात प्रलंबित राहत होती. प्रकरणांची वाढती संख्या व प्रकरणे तातडीने निकाली निघावीत यासाठी प्रादेशिक विशेष अधिकारी व जिल्हा चौकशी अधिकारी यांच्या कक्षेतील सर्व प्रकरणे दिनांक १ जुलै, २००६ पासून कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडे सोपवून निकाली काढण्याचा निर्णय संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक २ अन्वये घेण्यात आला. त्यानुसार कंत्राटी तत्वावरील सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांच्या सेवा विविध विभागांनी उपयोगात आणल्या. सदर चौकशी अधिकाऱ्यांच्या पद्धतीबाबत या विभागाकडून आढावा घेतला असता विविध विभागांकडून करण्यात आलेल्या शिफारशी लक्षात घेवून प्रचलित कार्यपद्धतीत सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. आता शासनाने याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

गट-'अ' ते गट-'ड' मधील अधिकारी/कर्मचारी यांच्या विभागीय चौकशा करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांच्या पद्धतीत बदल करण्यात येत असून सुधारित पद्धत खालीलप्रमाणे राहील.

**अ)** गट-'अ' व गट-'ब' (राजपत्रित) यांच्याविरुद्धच्या विभागीय चौकशीची प्रकरणे सोपविण्यासाठी महसूल विभागस्तरावर ६ प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्यांची पदे निर्माण करण्यात येत असून सदर पदे उप सचिव वा समकक्ष अथवा त्यावरील वेतनश्रेणीतील राज्य शासकीय अधिकाऱ्यांकडून प्रतिनियुक्तीने भरण्यात यावी. ही पदे सामान्य प्रशासन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली राहतील. तसेच सदर पदे सामान्य प्रशासन विभागाकडूनच प्रतिनियुक्तीने भरण्यात यावीत.

सदर ०६ प्रादेशिक चौकशी अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील पदे (प्रत्येक महसूल विभागीय मुख्यालयात एक कार्यालय याप्रमाणे एकूण पदे) खालीलप्रमाणे राहतील.

**विभागीय चौकशी अधिकाऱ्यांची कार्यालये गट-अ व गट-ब च्या विभागीय चौकशीसाठी)**

| अ.क्र. | पदाचे नाव व वेतनश्रेणी | पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी<br>वेतन बँड रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन रु.७६००/- | ६ |
| २ | लघुलेखक (निम्नश्रेणी)<br>वेतन बँड रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४३००/- | ६ |
| ३ | लिपिक-टंकलेखक<br>वेतन बँड रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.१९००/- | ६ |
| ४ | शिपाई<br>वेतन बँड रु.४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१३००/- | ६ |

**ब) गट-क व गट-ड च्या विभागीय चौकशीसाठी सध्या अस्तित्वात असलेली कंत्राटी तत्वावरील सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांच्या प्रचलित पध्दतीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.**

गट-'क' व गट-'ड' च्या कर्मचाऱ्यांच्या चौकशीसाठी सध्या अस्तित्वात असलेली कंत्राटी तत्वावरील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडे विभागीय चौकशीची प्रकरणे सोपवून निकाली काढण्याची पध्दत खालील सुधारणा करुन आहे तशीच चालू ठेवण्यात यावी.

१. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या चौकशी अधिकाऱ्याकडे केवळ गट क व गट ड च्याच संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या विभागीय चौकशा देण्यात याव्यात.

२. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या चौकशी अधिकाऱ्यांच्या प्रचलित मानधन पध्दतीत बदल करुन एक अपचारी असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी रु.५०००/- इतक्या मानधनाऐवजी रु.८०००/- इतके मानधन देण्यात यावे.

३. एकापेक्षा अधिक अपचारी असल्यास प्रत्येक अपचाऱ्यामागे रु.१०००/- इतके वाढीव मानधन मूळ मानधनाच्या रकमेत (रु.८०००/-) वाढवून देण्यात यावे. मात्र सदर वाढीव मानधनाची कमाल मर्यादा रु.१५०००/- इतकी राहिल.

४. चौकशी अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आलेली विभागीय चौकशीची प्रकरणे जास्तीत जास्त सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये निकाली काढण्याचे बंधन टाकण्यात यावे. अशी कालमर्यादा पाळणे शक्य नसेल अशा प्रकरणी संबंधित चौकशी अधिकाऱ्यांनी ही बाब विभागप्रमुखांच्या/शिस्तभंगविषय प्राधिकाऱ्याच्या निदर्शनास आणावी. सदर कालमर्यादा प्रकरणाची सद्यस्थिती विचारात घेऊन विभागप्रमुखांनी ३ महिन्यापर्यंत मुदत वाढविण्यास अनुमती द्यावी. त्यासाठी शासन निर्णय क्रमांक:प्रविचौ-२००८/प्र.क्र.११/०८/११-अ, दि.७.४.२००८ मधील तरतूदीप्रमाणे कार्यवाही करावी.

२. सर्व संवर्गातील विभागीय चौकशी प्रकरणी सादरकर्ता अधिकाऱ्यांची नियुक्ती संबंधित कार्यालयाने/विभागाने त्यांच्या आस्थापनेवरील सेवाधीन अधिकाऱ्यांमधून करावयाची आहे.

३. कंत्राटी तत्वावरील सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांच्याबाबतीत उपरोक्त **'ब'** येथील बाबी वगळता दि.२६ मे, २००६ च्या शासन निर्णयान्वये नमूद केलेल्या अन्य तरतूदींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे हा शासन निर्णय अंमलात येण्यापूर्वी ज्या गट 'अ' व 'ब' च्या अधिकाऱ्यांच्या विरुध्दच्या

विभागीय चोकशी कंत्राटी तत्वावरील सेवानिवृत्त चोकशी अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आल्या असल्यास त्या पूर्ण करुन घ्याव्यात.

४. हा शासन निर्णय निर्गमित झाल्याचे दिनांकापासून अंमलात आणण्यात येत आहे.

५. उपरोक्त परिच्छेद १ मधील **'अ'** येथे नमूद प्रादेशिक चौकशी अधिकारी यांच्या कार्यालयांमधील पदांसाठी होणारा वेतनावरील आवर्ती खर्च व कार्यालयीन फर्निचर, संगणक व इत्यादीसाठीचा अनावर्ती खर्चास अनुसरुन वित्त विभागाकडून वित्तीय तरतूद उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५२९/०९/ व्यय-४, दिनांक ९.९.२००९ नुसार निर्गमित करण्यात आला असून महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला आहे व त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००९१०२७१७२५५०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( के. पी. बक्षी )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

राज्यपालाचे सचिव,
मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
मुख्य सचिव/सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव मंत्रालयीन विभाग,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
*सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/प्रादेशिक विभाग प्रमुख
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती
* पत्राने